## जाती प्रमाणपत्र देण्याची कार्यपध्दती

(१) अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमांती व विशेष मागास प्रवर्ग या प्रवर्गातील व्यक्तींना दयावयाची जातीची प्रमाणपत्र.

(२) महाराष्ट्र राज्यातील सवलती घेताना इतर मागास वर्ग, भटक्या जमाती, धनगर व तत्सम जाती (क) व वंजारी व तत्सम जाती (ड) यांना उन्नत व प्रगत गटात( क्रीमिलेअर) मोडत नसल्यासह जातीचे प्रमाणपत्र देणे.

(३) केंद्र शासनाने महाराष्ट्र राज्याची इतर मागास वर्गाची जी यादी घोषित केलेली आहे त्या यादीत नमूद असलेल्या जातीतील व्यक्तींना केंद्र शासनाच्या नियंत्रणाखालील पदाकरीता अर्ज करताना त्यासोबत सादर करावयाची जातीचे प्रमाणपत्र (उन्नत व प्रगत गटात (क्रीमिलेअर) मध्ये मोडत नसल्यास)

महाराष्ट्र शासन
सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व विशेष सहाय्य विभाग
शासन निर्णय क्रमांक: सीबीसी १०/२००१/प्र.क्र.१२०/ मावक-५
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२

दिनांक: १ नोव्हेंबर, २००१

वाचा:- १) मुंबई राज्य परिपत्रक पॉलीटिकल ॲन्ड सर्व्हिसेस डिपार्टमेंट क्र.४९०/४६, दिनांक.३०.४.१९५३.

२) शासन परिपत्रक समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व पर्यटन विभाग, क्रमांक सीबीसी १४७५/४२०/डी-५, दिनांक २३ सप्टेंबर, १९७५

३) शासन परिपत्रक, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व पर्यटन विभाग क्रमांक सीबीसी १४७५/ १९६८९/डी-५, दिनांक १५ ऑक्टोबर, १९७५

४) शासन परिपत्रक समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व पर्यटन विभाग क्रमांक सीबीसी १४७६/११०२७/डी-५, दिनांक ५ मे, १९७६

५) शासन पत्र समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व पर्यटन विभाग क्रमांक सीबीसी २१७७/डी-५, दिनांक १५.१.१९७७

६) शासन निर्णय, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व पर्यटन विभाग क्रमांक सीबीसी १०७७/५०७८६/डी-५, दिनांक २१.३.१९७९

७) शासन निर्णय, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व पर्यटन विभाग क्रमांक सीबीसी १६८२/५८५५३/(८९२)/का-५, दिनांक २९.१.१९८३

८) शासन निर्णय, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व पर्यटन विभाग क्रमांक

सीबीसी १०८३/३०४८०/(१२५४)/बीसीडब्ल्यू -५, दिनांक १७.१०.१९८५

९) शासन निर्णय, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व पर्यटन विभाग क्रमांक सीबीसी १०८४/४४५७७/(१८१३)/बीसीडब्ल्यू -५, १.११.१९८५

१०) शासन निर्णय, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व पर्यटन विभाग क्रमांक सीबीसी १०८४/७४९३२/(२०८३/बीसीडब्ल्यू-५, दिनांक ५.१२.१९८५

११) शासन निर्णय, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व पर्यटन विभाग क्रमांक सीबीसी १०८३/यु.ओ. ५६२/(१८७३/बीसीडब्ल्यू-५, दिनांक २७.१२.१९८५

१२) शासन परिपत्रक, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व पर्यटन विभाग क्रमांक सीबीसी १०८३/यु.ओ. ५६२/(१८७३/बीसीडब्ल्यू -५, दिनांक २१.१.१९८६

१३) शासन परिपत्रक, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व पर्यटन विभाग क्रमांक सीबीसी १६८४/गोप.५९२/(१९९९)/बीसीडब्ल्यू -५, दिनांक १९.२.१९८६

१४) शासन परिपत्रक, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व पर्यटन विभाग क्रमांक सीबीसी १५८४/७१७५१/२२९७/बीसीडब्ल्यू-५, दिनांक १८.४.१९८६

१५) शासन निर्णय, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व पर्यटन विभाग क्रमांक सीबीसी १०८५/ २६३०४/(२१९१)/बीसीडब्ल्यू -५, दिनांक ६.१०.१९८६

१६) शासन निर्णय, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व पर्यटन विभाग क्रमांक सीबीसी १६८६/१४६५८/(२४५२/मावक -५, दिनांक १.४.१९८७

१७) शासन निर्णय, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व पर्यटन विभाग क्रमांक सीबीसी १०९०/ २१३४८/(४२०)/मावक -५, दिनांक ८.११.१९९०

१८) शासन परिपत्रक समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग क्रमांक सीबीसी १०९४/प्र.क्र.४४८३/प्र.क्र. ८५/मावक-५, दिनांक १९.४.१९९४

१९) शासन निर्णय समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग क्रमांक सीबीसी १०९४/प्र.क्र. ८६/मावक-५, दिनांक १६.६.१९९४

२०) शासन परिपत्रक समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग क्रमांक सीबीसी १०९४/प्र.क्र.८६/मावक-५, दिनांक २२.६.१९९४

२१) शासन शुध्दीपत्रक, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग क्रमांक सीबीसी १०९४/प्र.क्र.८६/मावक-५, दिनांक २६.७.१९९४

२२) शासन निर्णय, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग क्रमांक सीबीसी १४९४/प्र.क्र.२३६/मावक-५, दिनांक १३.६.१९९५

२३) शासन निर्णय समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग क्रमांक सीबीसी १०९४/प्र.क्र.४४९३/प्र.क्र. ८५/मावक-५, दिनांक १९.४.१९९४

२४) शासन निर्णय समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग क्रमांक सीबीसी १०९४/प्र.क्र.४४८३/प्र.क्र. ८५/मावक-५, दिनांक १९.४.१९९४

२५) सह सचिव, कल्याण मंत्रालय, केंद्र शासन, नवी दिल्ली यांचे अ.शा.पत्र क्रमांक १२०१८/१३/९५-एससीडी/आरसेल, दिनांक २५.९.१९९५

२६) शासन परिपत्रक, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रीडा विभाग क्रमांक सीबीसी १०९५/प्र.क्र. २६४/मावक-५, दिनांक १९.१०.१९९५

२७) शासन परिपत्रक, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रीडा विभाग क्रमांक सीबीसी १०९५/प्र.क्र. २६४/मावक-५, दिनांक २४.१०.१९९५

२८) शासन परिपत्रक, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रीडा विभाग क्रमांक सीबीसी १०९५/प्र.क्र. २६४/मावक-५, दिनांक २४.१०.१९९५

२९) शासन परिपत्रक, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रीडा विभाग क्रमांक सीबीसी १०९६/प्र.क्र. ४८/मावक-५, दिनांक ९.७.१९९६

३०) शासन परिपत्रक, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रीडा विभाग क्रमांक सीबीसी १०९६/प्र.क्र.४८/मावक-५, दिनांक १३.९. १९९६

३१) शासन निर्णय, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रीडा विभाग क्रमांक सीबीसी १०९४/प्र.क्र.८६ /मावक-५, दिनांक ५ जुलै, १९९७ व समक्रमांच्या शासन निर्णय दिनांक ३ जुन, २०००

३२) शासन निर्णय, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रीडा विभाग क्रमांक सीबीसी १०९५/प्र.क्र. २६४/मावक-५, दिनांक २४.१०.१९९५

प्रस्तावना :- मा. सर्वोच्च न्यायालयाने विशेष अनुज्ञा याचिका क्रमांक १४७६७/९३ सिव्हील अर्ज क्रमांक ५८५४/९४ कुमारी माधुरी पाटील विरुध्द अप्पर आयुक्त, आदिवासी विकास, ठाणे व इतर यावर दिनांक २ सप्टेंबर, १९९४ रोजी असा निर्णय दिला आहे की, प्रत्येक राज्याने जातीची प्रमाणपत्रे निर्गमित करण्याची कार्यपध्दती सर्वोच्च न्यायालयाने घालून दिलेल्या मार्गदर्शक सुचनांनुसार विहित करण्यात यावी. मा. सर्वोच्च न्यायालयाने उपरोक्त अनुज्ञा याचिकेच्या निर्णयामध्ये घालून दिलेल्या मार्गदर्शक सुचना व केंद्रीय कल्याण मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या प्रस्तावनेतील क्रमांक २५ येथील दिनांक २५ सप्टेंबर, १९९५ च्या पत्रान्वये केलेल्या सूचना विचारात घेवून वरील प्रमाणे नमूद केलेल्या शासन निर्णयान्वये अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्गीय व विशेष मागासप्रवर्गातील व्यक्तींना जातीचे प्रमाणपत्रे निर्गमित करणेबाबत विहित केलेल्या कार्यपध्दतीत सुधारणा तसेच जातीची प्रमाणपत्रे देण्याचे कार्यपध्दतीबाबत सोबतच्या परिशिष्ट " अ " येथील शासन निर्णय / परिपत्रकाद्वारे वेळोवेळी ज्या सुचना / आदेश देण्यात आले आहेत त्या सर्व शासन निर्णय / परिपत्रकांचे एकत्रिकरण करण्याचा प्रश्न विचाराधीन होता.

शासन निर्णय : संदर्भीय शासन निर्णय / परिपत्रकान्वये अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्गीय व विशेष मागास प्रवर्गातील व्यक्तींना जातीची प्रमाणपत्रे निर्गमित करण्याच्या विहित केलेल्या कार्यपध्दतीत वेळोवेळी लागू करण्यात आल्या होत्या. या सर्व आदेशांचे एकत्रीकरण करुन पुढील प्रमाणे सुधारित सर्वसमावेशक आता देण्यात येत आहेत.

१) अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्गीय व विशेष मागास प्रवर्गातील व्यक्तींना जातीची प्रमाणपत्रे हया शासन निर्णयासोबत जोडलेल्या परिशिष्ट "अ" मध्ये नमुद केलेल्या सुचनानुसार निर्गमित करावी.

१) अनुसूचित जातीच्या व्यक्तींना दयावयाच्या जातीच्या प्रमाणपत्राचा नमुना परिशिष्ट "ब"

२) विमुक्त जाती व भटक्या जमाती ( जानेवारी १९९० पूर्वीच्या ) यांना दयावयाच्या जातीच्या प्रमाणपत्राचा नमुना परिशिष्ट "क"

३) महाराष्ट्रातील सवलती घेतांना इतर मागासवर्ग, भटक्या जमाती, धनगर व तत्सम (क) व वंजारी व तत्सम (ड) यांना दयावयाचा जाती प्रमाणपत्राचा नमुना परिशिष्ट "ड"

४) विशेष मागासप्रवर्गातील व्यक्तींना दयावयाचा जाती प्रमाणपत्राचा नमुना परिशिष्ट "इ"

५) केंद्र शासनाने तयार केलेल्या महाराष्ट्र राज्याशी संबंधित असलेल्या इतर मागासवर्गीयांच्या ( महाराष्ट्र राज्याच्या इतर मागासवर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गातील ज्या जातींचा समावेश आहे अशा जाती ) यादीत समाविष्ट असलेल्या जातीच्या व्यक्तींना केंद्र शासनाच्या आरक्षणाचा लाभ घेण्यासाठी सादर करावयाच्या प्रमाणपत्राचा नमुना परिशिष्ट "ई "

२) खाली नमूद केलेल्या प्राधिका-यांना अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्गीय व विशेष मागासप्रर्वातील जातीच्या व्यक्तींना जातीचे प्रमाणपत्र निर्गमित करण्यासाठी सक्षम प्राधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. त्याचप्रमाणे ज्या जातींना उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे प्रमाणपत्र सादर करावे लागते त्यांना असे प्रमाणपत्र निर्गमित करण्यासाठी देखील सक्षम प्राधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

१) संबंधित उप विभागीय अधिकारी (महसूल )
२) उप जिल्हाधिकारी किंवा
३) जिल्हाधिकारी

संबंधित जिल्हाधिका-यांनी प्रशासकीय दृष्टया प्रमाणपत्राच्या कामाची वाटणी उप जिल्हाधिकारी व उप विभागीय अधिकारी (महसूल ) यांच्यामध्ये करावी.

३) महाराष्ट्र राज्याच्या सवलती घेतांना इतर मागासवर्ग, भटक्या जमाती -धनगर व तत्सम (क), भटक्या जमाती वंज़ारी व तत्सम (ड) यांनी जातीचा दाखला उन्नत व प्रगत गटात ( Creamy Layer ) मध्ये मोडत नसल्याचे प्रमाणपत्र प्राप्त करुन घेण्याकरिता सादर करावयाच्या अर्जाचा नमुना परिशिष्ट "फ "

४) केंद्र शासनाच्या आरक्षणाचा लाभ घेण्याकरिता जातीचा दाखला मिळण्यासाठी ज्या नमुन्यात अर्ज सादर करावयाचा तो नमुना परिशिष्ट " ग "

५) एखादी व्यक्ती अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्गीय व विशेष मागासप्रवर्गातील नसुनही त्या व्यक्तीस अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्गीय व विशेष मागस प्रवर्गातील असल्याचे जातीचे प्रमाणपत्र देण्यात आले आहे याबद्दल कोणत्याही तक्रारीची जाती प्रमाणपत्र तपासणी समिती, ज्या क्षेत्रातील असेल ती जातीप्रमाणपत्र तपासणी समिती संबंधित दक्षता-पथकामार्फत अशा तक्रारीची चौकशी करील व अशी तक्रार प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून त्यावर सहा महिन्याच्या आत निर्णय घेईल. याबाबत जाती प्रमाणपत्र तपासणी समितीचा निर्णय अंतिम राहील.

६) अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्गीय व विशेष मागास प्रवर्गातील व्यक्तींनी जातीची प्रमाणपत्रे निर्गमित करण्याबाबतचे यापूर्वी निर्गमित केलेले सर्व आदेश एकत्रित करुन अदयावत सूचना सोबत जोडल्या आहेत.

७) वरील आदेश तात्काळ लागू करण्यात येत आहेत. तसेच या आदेशांचे व सुचनांचे अनुपालन काटेकोरपणे याबाबतची दक्षता सर्व सक्षम प्राधिका-यांनी घ्यावी.

( वि. वा. मेहेर )
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,
राज्यपालाचे सचिव,

# परिशिष्ट " अ "

अनुसूचित जाती, १४ विमुक्त जाती व जानेवारी १९९० पूर्वीच्या भटक्या जमाती तसेच दिनांक १४.२.२००१ रोजी विमुक्त जाती व भटक्या जमाती व विशेष मागासप्रवर्ग यांना जातीची प्रमाणपत्रे देणे.

महाराष्ट्रातील इतर मागासवर्ग, भटक्या जमाती, धनगर (क), वंजारी (ड) यांना जातीचे प्रमाणपत्र व उन्नत व प्रगत गटात ( क्रिमीलेअर) मोडत नसल्याचे प्रमाणपत्र

केंद्र शासनाची महाराष्ट्र राज्याशी संबंधित इतर मागासवर्गीयांची जी यादी आहे त्या यादीतील व्यक्तींना जातीची प्रमाणपत्रे व उन्नत व प्रगत गटात ( क्रिमीलेअर) मोडत नसल्याचे प्रमाणपत्र देण्याबावत.

१. ज्या व्यक्तीस किंवा आई वडिलांना / पालकांना त्यांच्या पाल्यास जाती प्रमाणपत्राची आवश्यकता असेल त्यांना खालीलपैकी कोणत्याही प्राधिका-यांच्या नावे विहित केलेल्या नमुन्यात लेखी अर्ज आवश्यक त्या कागदपत्रांसह संबंधित तहसिलदार कार्यालयाकडे सादर करावा. व ते अर्ज संबंधित तहसिलदार यांनी खालील अधिका-यांकडे रोजच्या रोज पाठवावे.

अ) संबंधित उप विभागीय अधिकारी ( महसूल )

ब) उप जिल्हाधिकारी किंवा

क) संबंधित जिल्हाधिकारी

जिल्हाधिका-यांनी प्रशासकीय दृष्टया प्रमाणपत्राच्या कामाची वाटणी उप जिल्हाधिकारी आणि उप विभागीय अधिकारी ( महसूल ) यांच्यामध्ये करावी.

२. अर्जदाराने अर्जात खोटी माहिती दिली आहे व ती माहिती खोटी असल्याचे नंतर आढळून आल्यास इंडियन पिनल कोडमधील कलम १९९ व २०० मधील तरतुदीनुसार शिक्षेस पात्र राहील असे अर्जदारानी अर्जात स्पष्टपणे नमूद केले पाहिजे.

३. अर्जदार हा संबंधित गांवचा रहिवायी आहे असे त्यांनी अर्जात स्पष्टपणे नमूद केले पाहिजे व त्याबद्दलचा कागदोपत्री पुरावा सादर केला पाहिजे. तसेच अर्जदार किंवात्यांचे आई वडिल किंवा पालक यांनी प्रतिज्ञापत्र लेखी सादर करावे, की ज्या प्रतिज्ञापत्रामध्ये रहिवासाचे मूळ ठिकाण, जात, उपजात याचा तपशील असावा व सदरहू प्रतिज्ञापत्र राजपत्रित अधिकारी किंवा अराजपत्रित अधिकारी यांच्या सही शिक्यानिशी साक्षांकित केलेले असावे. प्रतिज्ञापत्रात जातीच्या दाव्याबाबत ज्या पुराव्याचा उल्लेख केला आहे तो जोडण्यात यावीत. उदा. शाळा सोडल्याचा दावा ( प्राथमिक/माध्यमिक) तलाठयाचा दाखला, सरपंचाचा दाखला किंवा त्या गावातील / शहारातील प्रतिष्ठीत व्यक्तीने, त्या व्यक्तीच्या जातीबाबत प्रमाणित केलेला दाखला.

४. अर्जदार हा अर्जात नमूद केलेल्या जातीचाच आहे याबाबत त्याने सबळ पुरावा सादर केला पाहिजे.

५. अर्जदाराने एखादया सक्षम अधिका-याकडे जातीच्या प्रमाणपत्रासाठी पूर्वी अर्ज केला असेल किंवा सक्षम अधिका-याने ( महाराष्ट्रातल किंवा इतर राज्यातील ) त्यास जातीचे प्रमाणपत्र दिलेले असेल तर त्याबाबतचा स्पष्ट उल्लेख अर्जामध्ये करावयास पाहिजे व अशा प्रमाणपत्राची सत्यप्रत अर्जासोबत जोडली पाहिजे.

६. सर्वसाधारणपणे जातीची नोंद शाळा सोडल्याच्या प्रमाणपत्रात केलेली असते. अर्जदाराने सादर केलेल्या कागदोपत्री पुराव्यावरुन अर्जदार हा तो शिकत असलेल्या शेवटच्या शाळेच्या ( विशेषत: प्राथमिक शाळेच्या ) सोडल्याच्या प्रमाणपत्रात नमूद केलेल्या जातीचाच आहे अशी सक्षम अधिका-याची खात्री झाली तर अर्जदारास जातीचे प्रमाणपत्र देण्यात यावे.

७. सक्षम प्राधिका-याने अर्जदाराने केलेल्या जातीच्या दाव्याची काळजीपूर्वक छाननी करावी.

८. सक्षम प्राधिका-याने अर्जदाराच्या नातेवाईकाच्या जातीच्या नोंदी महसूली नोंदवहीत किंवा जन्म व मृत्यू नोंदवहीत आढळत असतील तर तशी कागदपत्रे पहावीत.

९. ज्या जाती / समाजाची संघटना सोसायटी ॲक्ट किंवा सार्वजनिक न्यास अधिनियमांतर्गत नोंदणीकृत झालेली आहे, त्या समाजाच्या / जातीच्या संघटनेकडून सादर केलेले प्रमाणपत्र.

१० सक्षम प्राधिका-यानी त्यांना आवश्यकता भासल्यास गृह चौकशी करावी. किंवा महसूली यंत्रणेमार्फत चौकशी करण्यात यावी.

११. अर्जदाराचे वडिल किंवा इतर जवळचे नातेवाईक शासकीय किंवा तत्सम सेवात असतील किंवा पूर्वी असतील तर त्यांचा सेवापुस्तकातील जात व कायम रहिवासाचे ठिकाण यासंबंधीच्या नोंदीची सत्यप्रत अर्जदाराने अर्जासोबत जोडली पाहिजे.

१२. सक्षम प्राधिका-याच्ज्ञ अधिकार क्षेत्रामध्ये ज्यांचे कायम वास्तव्य आहे अशा अर्जदाराला जातीचे प्रमाणपत्र देण्याचा अधिकार आहे. अनुसूचित जातीच्या परिशिष्ट "ब" मधील नमुन्यात जातीप्रमाणपत्र देतांना परिच्छेद १ व ३ ठेवण्यात यावा व परिच्छेद २ गळण्यात यावा. कायम रहिवास म्हणजे जो रहिवास सेवा, नोकरी, शिक्षण व कारावास इत्यादी कारणा करिता नसलेला रहिवास.

१३. जे स्थालांतरीत अनुसूचित जातींपैकी आहेत त्यांना त्या राज्यातील सक्षम प्राधिका-यांनी जातीचे प्रमाणपत्र देतांना अर्जदाराच्या वडिलांना त्यांच्या मूळच्या राज्यातील सक्षम प्राधिका-यांनी जे जातीचे प्रमाणपत्र दिले असेल ते सादर केल्यास त्या आधारे स्थलांतरीतांना दयावयाचा जातीच्या प्रमाणपत्राच्या नमुन्यात जातीचे प्रमाणपत्र देण्यात यावे. ज्या ठिकाणी सखोल चौकशी त्यांच्या मुळच्या राज्यात करावयाची आहे अशी प्रकरणे वगळली आहेत. स्थलांतरीतांना जातीचे प्रमाणपत्र देतांना भारत सरकार, गृह मंत्रालय यांच्या दिनांक ६ ऑगस्ट, १९८४ चे पत्र क्रमांक बीसी १६०१४ङ२/८२ ञएससीएनबीसीडी -१ व दिनांक २२ फेब्रुवारी, १९८५ चे पत्र क्रमांक बीसी १६०१३/१/८२-एससीएनबीसीडभ ५१ मधील पत्रात ज्या सूचना दिलेल्या आहेत त्यांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे. त्यांना जातीचे प्रमाणपत्र देतांना परिशिट "ब" मधील नुमन्यातून परिच्छेउ १ व २ ठेवावे व परिच्छेद ३ वगळण्यात यावा.

१४. महाराष्ट्र राज्याच्या अनुसूचित जातीच्या यादीमध्ये ज्या जातीची नोंद आहे अशा जातीतील ज्या व्यक्तीचे कायम वास्तव्य महाराष्ट्र राज्य हे आहे त्यांना सूचना क्रमांक १२ मध्ये नमूद केलेल्या सूचना नुसार जातीची प्रमाणपत्र देण्यात यावे, भारत सरकार, गृह मंत्रालय यांचे पत्र क्रमांक बीसी १२०२५/२/७६/एससीटी-१, दिनांक २२ मार्च, १९७७ मध्ये नमूद केलेल्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे.

१५. महाराष्ट्र राज्यातील सवलती घेण्योकरिता इतर मागासवर्ग, भटक्या जमाती, धनगर व तत्सम जाती (क) वंजारी व तत्सम जाती (ड) यांना जातीचे प्रमाणपत्र उन्नत व प्रगत गटात ( क्रिमीलेअर) मोडत नसल्याचे प्रमाणपत्र संदर्भाधीन अनुक्रमांक ३१ येथील शासन निर्णय, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रीडा विभाग ५ जून, १९९७ व शुध्दीपत्र दिनांक ६ जुन, २००० मध्ये नमुद केलेल्या निकष व अटींची पुर्तता करुन घेवून देण्यात यावी. संदर्भाधीन क्रमांक ३३ वरील शासन

परिपत्रक दिनांक ३०.६.१९९८ येथील सूचना विचारात घेता, क्रिमीलेअर मध्ये मोडत नसल्याबाबत प्रमाणपत्र देतांना उत्पन्न निकषाच्या तपासणीनुसार संबंधीताचे मागील ३ वर्षाचे सलग प्रतिवर्षी उत्पन्न रुपये दोन लाख किंवाम त्यापेक्षा जास्त असल्यास संबंधित व्यक्ती क्रिमीलेअर गटात मोडते. ज्या ३ वर्षाच्या कालावधी मध्ये संबंधिताचे उत्पन्न एखादया वर्षी जर रुपये दोन लाखा पेक्षा कमी असेल तर ती व्यक्ती क्रीमीलेअर गटात मोडत नाही. प्रत्येक वर्षाचे उत्पन्न स्वतंत्र विचारात घ्यावे. तीन्ही वर्षाची सरासरी विचारात घेवू नये.

१६. केंद्र शासनाने महाराष्ट्र राज्याची जी इतर मागासवर्गीयांची यादी घोषित केलेली आहे त्या यादीतील जातीच्या व्यक्तींना केंद्र शासनाच्या नियंत्रणाखाली पदा करिता अर्ज करावयाचा असल्यास त्याकरिता प्रमाणपत्राचा जो नमुना ज्या मध्ये उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचा उल्लेख आढळतो ते प्राप्त करुन घेण्याकरिता ज्या अटी व शर्ती भारत सरकार, मिनिस्ट्री ऑफ पर्सोनल ग्रिव्हन्स अ‍ॅण्ड पेन्शन ( डिपार्टमेंट ऑफ पर्सोनल अ‍ॅण्ड ट्रेनिंग ) यांचे पत्र क्रमांक ३६०१२/२२/९३-ईएसटीटी (एससीटी) दिनांक ८ सप्टेंबर, १९९३ यांच्या कार्यालयीन ज्ञापनात नमूद केलेल्या आहेत त्यांचे पालन करुन विहित नमुन्यात प्रमाणपत्र देण्यात यावे.

१७. जाती प्रमाणपत्राच्या नमुन्याच्या प्रती कार्यालयाने छापून घ्याव्यात व अशासकीय संस्थांनी किंवा व्यक्तींनी छापलेले नुमने कोणत्याही परिस्थितीत उपयोगात् आणण्यात येऊ नये. संबंधित कार्यालयाने प्रमाणपत्रात जातीचा अनुक्रमांक नमुद करावा व तो ठळक असावा.

१८. जातीचे वर्गीकरण व जात अचूक असावी. महाराष्ट्र राज्याकरिता असलेली अनुसूचित जातीची यादी केंद्र शासनाने भारतीय संविधानाच्या अनुच्छेद ३४१ व त्यानुसार काढलेल्या अध्यादेश १९ प्रमाणे विहित करण्यात आली आहे. केंद्र शासनाने महाराष्ट्र राज्याशी संबंधित सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागासलेल्या वर्गाची (इ.मा.व.) यादी कल्याण मंत्रालय, भारत सरकार यांचा निर्णय क्रमांक १२०११/६८/९३ -बीसीसी (सी) दिनांक १० सप्टेंबर, १९९३ अन्वये प्रसिध्द केलेली आहे व त्यामध्ये वेळोवेळी केलेल्या सुधारणा विचारात घ्याव्यात.

१९. महाराष्ट्रातील इतर मागासवर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गातील जाती वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णय व परिपत्रकाद्वारे प्रसिध्द केलेली आहे.

२०. जी व्यक्ती अनुसूचित जातीचा असल्याचा दावा करते तीचा धर्म हिंदू किंवा शीख किंवा बौध्द धर्म असू शकतो.

२१. इतर मागासवर्गीयामध्ये समाविष्ट असलेल्या जातींना कोणतेही धार्मिक बंधन घालण्यात आलेले नाही. विमुक्त जाती व भटक्या जमातीचा असल्याचा दावा केल्यास त्याचा धर्म हिंदू किंवा शीख असू शकतो. तसेच मुस्लीम धर्मीयांपैकी ज्या मूळ जाती / पोटजाती, विमुक्त जाती / भटक्या जमातींमध्ये समाविष्ट आहेत त्याच जातीच्या व्यक्ती विमुक्त जाती, भटक्या जमाती जातीचा दावा करु शकतात. त्यांचा धर्म मुस्लिम असू शकतो.

२२. अनुसूचित जातीतून खिस्ती धर्म स्विकारलेल्यांचा समावेश इतर मागासवर्गात केलेला आहे त्यांना जातीचे प्रमाणपत्र देतांना ते खिस्ती धर्म स्विकारण्यापूर्वी अनुसूचित जातीचे होते असे ते ज्या चर्चच्या कार्यकक्षेत राहतात त्या चर्च प्रमुखांकडून प्रमाणित करुन घ्यावे.

२३. १) जी व्यक्ती एका ठिकाणाहून दुस-या ठिकाणी स्थलांतरीत होते तेव्हा ती व्यक्ती ज्या राज्यातील मागासवर्गीय आहे त्या राज्यामध्ये ती मागासवर्गीय म्हणून दावा करु शकते. स्थलांतरीत झालेल्या राज्यात तो दावा करता येणार नाही.

२) खालील दोन प्रवर्गातील व्यक्तींना " स्थलांतरीत " म्हणून जाती प्रमाणपत्र देण्याच्या उद्देशाकरिता विचारात घ्यावयाचे आहे.

अ) ज्या व्यक्तीची जात मागासवर्गीय म्हणून अनुसूचित झाली आहे ( अनु. जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग आणि विशेष मागसप्रवर्ग ) ती जात महाराष्ट्र राज्यात व इतर राज्यात आढळून येते. परंतु अशा व्यक्तीचे कायम वास्तव्याचे ठिकाण हे घटना आदेशाच्या किंवा शासन निर्णयाच्या दिनांकाला ती व्यक्ती किंवा त्याचे वडिल, पणजोबा हे महाराष्ट्र राज्याच्या बाहेरील रहिवाशी आहेत.

ब) ज्या व्यक्तींची जात मागासवर्गीय म्हणून ( अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्ग ) महाराष्ट्र राज्या व्यतिरिक्त इतर राज्यात व केंद्र शासीत प्रदेशात अनुसूचित झाली आहे.

३) घटना आदेश व शासन निर्णय निर्गमित झाला आहे त्या दिनांकाला ज्या ठिकाणी जी व्यक्ती कायम राहत आहे तो रहिवास मागासवर्ग म्हणून दर्जा प्राप्त होण्यासाठी आवश्यक असतो. जी व्यक्ती या घटना आदेशाच्या किंवा शासन निर्णयाला ज्या ठिकाणी कायम राहत असतील त्या ठिकाणचे वास्तव्य त्या व्यक्तीला कायम वास्तव्याचे ठिकाण म्हणून प्राप्त होईल.

४) अर्जदार महाराष्ट्र राज्याच्या सर्वसाधारण रहिवासी असेल तर अनुसूचित जातीपैकी असल्यास १० ऑगस्ट, १९५० या तारखेस आणि विमुक्त जाती, भटक्या जमाती पैकी असल्यास दिनांक २१.११.१९६१ इतर मागासवर्गीयांच्या असल्यास दिनांक १३.१०.१९६७ विशेष मागास प्रवर्गाचा असल्यास दिनांक १३.६.१९९५ या तारखांना तसेच वरील यादयामध्ये ज्या शासकीय आदेशान्वये विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्ग म्हणून ज्या जाती नव्याने समाविष्ट करण्यात आल्या असतील त्या तारखेस संबंधित अर्जदाराचे किंवा अर्जदाराचा जन्म या तारखे नंतर झाला असल्यास त्याच्या वडिलांचे कायम वास्तव्य ज्या ठिकाणी होते त्या क्षेत्राशी संबंधित असलेला सक्षम प्राधिकारी जातीचे प्रमाणपत्र देण्यास सक्षम आहे.

२४. जातीचा दाखला देतांना सक्षम प्राधिका-याने जातीच्या दाखल्यात पुढील बाबी स्पष्टपणे नमूद कराव्यात.

अ) जातीच्या दाखल्यामध्ये जात स्पष्टपणे लिहिलेली असावी. ती संक्षेपात्मक असू नये.

ब) जातीचे वर्गीकरण जसे अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग हे सुध्दा स्पष्टपणे नमूद करावे.

क) जातीचे प्रमाणपत्र शासनाने विहित केलेल्या नमुन्यातच द्यावे.

ड) प्रमाणपत्रामध्ये ज्या शासकीय आदेशान्वये जी जात मागासवर्गीयांच्या यादीत समाविष्ट करण्यात आली असेल त्या आदेशाचा क्रमांक व दिनांक व त्या जातीचा यादीतील अनुक्रमांक नमूद करावा. आणि ती व्यक्ती सक्षम प्राधिका-याच्या कार्यक्षेत्रात सर्वसाधारण रहिवास वास्तव्याचा उल्लेख करावा.

२५. इतर मागासवर्गीयांच्या यादीत समाविष्ट असलेल्या मुख्य जातीचा स्पष्ट संदर्भ असेल तरच सक्षम प्राधिका-यांनी अशा पोट जातीच्या लोकांना मुख्य जातीची प्रमाणपत्र दयावीत. उदा. इतर मागासवर्गीयांच्या यादीत कुणबी जातीचा समावेश आहे. एखादया व्यक्तीच्या कागदोपत्री तिलोरी कुणबी

किंवा खैरे कुणबी असा शब्द प्रयोग असेल तरच कुणबी ही जात मागासवर्गीयांच्या यादीत असल्याने व ती मुख्य जात असल्याने त्या व्यक्तीस कुणबी जातीचे प्रमाणपत्र देण्यात यावे. निव्वळ तिलोरी, खैरे यासारखी नांवे असल्यास अशा व्यक्तीस जातीचे प्रमाणपत्र देता येणार नाही. कारण तिलोरी, खैरे यासारखी नांवावरुन मुख्य जात स्पष्ट होत नाही.

२६. लेवा कुणबी, लेवा पाटील, लेवा पटीदार या जातींच्या व्यक्तींबाबत शासन परिपत्रक, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रीडा विभाग क्रमांक सीबीसी,१०९५/८३१/प्र.क्र. १००/मावक-५, दिनांक १५ सप्टेंबर, १९९५ मध्ये केलेल्या स्पष्टीकरणानुसार जातीची प्रमाणपत्रे दयावीत.

२७. बुरुड या जातीच्या व्यक्तींना प्रमाणपत्र देतांना शासन निर्णय, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रीडा विभाग क्रमांक सीबीसी १४९३/प्र.क्र. २१०/मावक-५, दिनांक ९ नोव्हेंबर, १९९५ मध्ये केलेल्या खुलाश्यानुसार जातीची प्रमाणपत्रे दयावीत.

२८. मुस्लीम जातीच्या व्यक्तींना जातीचे प्रमाणपत्र देतांना शासन पत्र, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रीडा विभाग क्रमांक सीबीसी १०९५/प्र.क्र. २२६/मावक-५, दिनांक १९ ऑक्टोबर, १९९५ सोबत जोडलेल्या परिशिष्टात नमूद केलेल्या माहितीच्या आधारे दयावे.

२९. अर्जदाराने अनुसूचित जातीचे प्रमाणपत्रे मिळावे यासाठी अर्ज केला असल्यास त्याच्या वडिलाचे प्रमाणपत्र अनुसूचित जातीचे असेल परंतु अर्जदाराच्या कागदोपत्री नवबौध्द किंवा अनुसूचित जाती मधून खिश्चन धर्मात धर्मातंरीत असे नमूद केले असल्यास भारत सरकार गृह मंत्रालय यांच्या दिनांक २ मे, १९७५ च्या परिपत्रक क्र. ३५/१/७२/आरयु/ (एसटीसी-v) मध्ये नमूद केलेल्या बाबीची पुर्तता करुन घेवून अशा अर्जदारास त्याच्या स्वतःच्या कागदपत्राच्या आधारावर अनुसूचित जातीचे किंवा इतर मागासवर्गीय म्हणून प्रमाणपत्र देण्यात यावे.

३०. एका जिल्हयातून दुस-या जिल्हयात शिक्षण, नोकरी वगैरे निमित्त स्थलांतरीत होणा-या अनुसूचित जातीच्या व्यक्तीस त्या राज्याच्या संदर्भात अनुसूचित जातीचे समजता येते. तथापि ज्या जातीच्या संदर्भात क्षेत्र बंधन आहे त्या जातीच्या व्यक्तीला त्या विशिष्ट क्षेत्राच्या सक्षम अधिका-याकडून जातीचे प्रमाणपत्र घ्यावे लागेल. म्हणजेच अनुसूचित जातीच्या व्यक्तीचे सर्वसाधारण रहिवासाचे ठिकाण क्षेत्र बंधन असलेल्या क्षेत्रात असेल आणि ती व्यक्ती त्याच राज्याच्या दुस-या जिल्हयात नोकरी, शिक्षण वगैरे निमित्त स्थलांतरीत होत असेल तर त्या व्यक्तीला त्यांच्या मुळ जिल्हयातून जातीचे प्रमाणपत्र आणावे लागेल. परंतु त्या व्यक्तीने त्यांच्या वडिलांच्या सर्वसाधारण रहिवास असलेल्या जिल्हयाच्या सक्षम अधिका-याकडून त्यांच्या वडिलास मिळालेले जातीचे प्रमाणपत्र सादर केल्यास त्या व्यक्तीला ज्या जिल्हयात स्थलांतरीत झाला असेल त्या जिल्हयाच्या अधिका-याकडून प्रमाणपत्र घेता येईल.

३१. महाराष्ट्र राज्याच्या सवलती करिता इतर मागासवर्गीयांच्या यादीत मुख्य जाती दर्शविण्यात आल्या आहेत त्या जातीच्या उप जातींना सुध्दा जाती प्रमाणपत्रासाठी पात्र ठरविले आहे. त्या पोटजातीच्या, उप जातीच्या व्यक्ती व मुख्य जातीचे नांवे जातीचे प्रमाणपत्र देण्यात यावे.

३२. सक्षम प्राधिका-याने जातीच्या प्रमाणपत्रावर उप विभागीय अधिकारी (महसूल)/ उप जिल्हाधिकारी किंवा जिल्हाधिकारी म्हणून स्वतःची स्वाक्षरी करावी व त्यावर पदनामाचा व कार्यालयाचा गोल शिक्का मारुन प्रमाणपत्र दयावे. तसे नसल्यास ते प्रमाणपत्र वैध धरले जाणार नाही.

३३. एखादी जात मागासवर्गीयांच्या यादीत समाविष्ट आहे किंवा नाही, ती जात मागासवर्गीयांच्या यादीत समाविष्ट असलेल्या जातीची तत्सम जात, पोटजात किंवा उप जात आहे किंवा नाही याबाबत किंवा

अशात हेची शंका असल्यास अशा प्रकरणात संबंधित जात प्रमाणपत्र पडताळणी समितीचा सल्ल घेण्यात यावा.

३४. जातीच्या प्रमाणपत्राकरिता अर्ज मिळाल्या पासून १५ दिवसामध्ये निकाली काढला पाहिजे. अर्जावर निर्णय देण्यापूर्वी अर्जदाराने अर्जासोबत जोडलेल्या कागदपत्रांसह सत्यप्रती सक्षम प्राधिका-याने मुळ कागदपत्राबरोबर तपासून पाहिल्या पाहिजेत.

३५. अर्ज मान्य केला किंवा नाकारला त्याची कारणे व निर्णय स्पष्टपणे नमूद केले पाहिजेत. अर्जदाराने अर्जात दिलेल्या जातीच्या खरेपणा बद्दल सक्षम प्राधिका-याची खात्री झाली नसेल तर अर्ज नाकारण्यात यावा व अर्ज नाकारण्याची कारणे अर्जदारास लेखी कळविण्यात यावीत. अर्जदारास नाकारण्याची कारणे प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून ३० दिवसाच आत त्या निर्णयाविरुध्द संबंधित विभागीय जात प्रमाणपत्र पडताळणी समितीकडे लेखी स्वरुपात अपील दाखल करता येईल.

३६. एखादी व्यक्ती, अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्गीय व विशेष मागासप्रवर्ग हया प्रवर्गातील नसुनही त्या व्यक्तीस अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्गीय व विशेष मागास प्रवर्गाचे असल्याचे प्रमाणपत्र दिलेले आहे. याबद्दलच्या कोणत्याही तक्रारीची जाती प्रमाणपत्र तपासणी समिती ज्या क्षेत्रातील असेल ती समिती संबंधित दक्षता पथका मार्फत तक्रारीची चौकशी करील व अशी तक्रार आल्यापासून सहा महिन्याच्या आत त्यावर निर्णय देईल. तपासणी समितीने दिलेला निर्णय अंतिम राहिल. सदरहू निर्णय ज्या सक्षम अधिका-याने जातीचे प्रमाणपत्र दिले आहे त्यास कळविण्यात येईल. सक्षम अधिका-याने संबंधित जात प्रमाणपत्र रद्द करण्याची कार्यवाही तात्काळ करावी. तसेच संबंधित अर्जदाराविरुध्द उचित कार्यवाही देखील करावी.

३७. ज्या सक्षम प्राधिका-याने एखादया व्यक्तीस ती विशिष्ट जातीची नसतांना देखील त्या विशिष्ट जातीचे प्रमाणपत्र दिले आहे असे चौकशीअंती आढळून आले तर त्या प्राधिका-या विरुध्द महाराष्ट्र नागरी सेवा ( शिसत व अपील ) नियम १९७९ नुसार त्यांच्यावर कारवाई करण्यास सक्षम असलेल्या अधिका-याने कार्यवाही करावी याशिवाय फौजदारी खटला देखील सक्षम प्राधिकारी त्यांचेवर धरु शकतात.

३८. शासन निर्णय, दिनांक ३ जुन, १९९६ अन्वये जातीची प्रमाणपत्रे देण्याचे अधिकार उप विभागीय अधिकारी, उप जिल्हाधिकारी व जिल्हाधिकारी यांना देण्यात आलेले आहेत. असे असले तरी दिनांक ३ जुन, १९९६ पूर्वी जातीचे प्रमाणपत्र देण्यास सक्षम असलेल्या तहसिलदार / तालुका कार्यकारी दंडाधिकारी यांनी दिलेली जातीची प्रमाणपत्रे ज्यांचेकडे असतील अशा जातीची प्रमाणपत्रे नियुक्ती अधिकारी व सव संबंधितांनी ग्राहय धरावीत.

३९. "गोवारी , गवारी " जातीच्या ज्या विदयार्थ्याच्या शाळा सोडल्याच्या दाखल्यामध्ये " गोंड गोवारी" अशी नोंद आहे अशा विद्यार्थ्यांच्या वडिलांच्या किंवा त्यांच्या वडिलांच्या स्वतःच्या नात्यातल्या व्यक्तींच्या जातीच्या नोंदी ज्या कागदपत्रामध्ये घेतल्या जातात त्या कागदपत्रामध्ये " गोवारी, गवारी " म्हणून उल्लेख असल्यास त्यांना शासन निर्णय समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व पर्यटन विभाग क्रमांक सीबीसी १०९७/प्र.क्र. २०५/मावक-५, दिनांक २५.७.१९९७ नुसार दिलेल्या स्पष्टीकरणानुसार " गोवारी, गवारी " या विशेष मागासप्रवर्गाचे जातीचे प्रमाणपत्र देण्यात यावे.

४०. शासन निर्णय, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रीडा विभाग दिनांक ७ मे, १९९९ अन्वये आंतरजातीय विवाह करणा-या जोडप्यातील अमागासवर्गीय व्यक्तीला देण्यात येणारे मागासवर्गीयांचे फायदे रद्द करण्यात आले आहेत. त्यामुळे यापुढे कपल सर्टीफिकेट देता येणार नाही. तथापि या जोडप्यातील मागासवर्गीय पुरुष किंवा स्त्री जन्माने ज्या जातीची असेल त्या जातीच्या सवलती त्यांना मिळतील. तसेच वडिल मागासवर्गीय असेल तर त्यांच्या अपत्यांनाही वडिलांच्या जातीच्या सवलती मिळतील. परंतु आईच्या जातीच्या सवलती तीच्या अपत्यास मिळणार नाही.